महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
Maharashtra Industrial Development Corporation
(A Government of Maharashtra Undertaking)
मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई 400 093.
Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
☎:022-2687 0027/52/54/73
प्रिन्सिपल कार्यालय : 4,4 (ऐ) 12 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-1, कफ परेड, मुंबई 400 005.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trad Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.
☎: +91-22-22151451/52/53
www.midcindia.org

जा.क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/ B57932 दिनांक: 10/05/23

# परिपत्रक

**विषय: प्राधान्य सदराखाली ई-व्हेईकल चार्जिंग स्टेशनकरिता व्यापारी दराने जागा वाटपाबाबत.**

इलेक्ट्रीक वाहन चार्जिंग स्टेशन ही बाब (Activity) औद्योगिक सदरात मोडत नसून सेवा उद्योग या सदरात समावेश होत असल्याने या बाबीस वाणीज्यीक प्रयोजन म्हणून विचारात घेणे आवश्यक असल्याने सदर प्रयोजनासाठी व्यापारी दराने भूखंड वितरीत करण्याबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

तसेच, राज्य शासनाने मागणी विषयक प्रोत्साहनाद्वारे राज्यात इलेक्ट्रिक वाहनांची खरेदी आणि वापर वाढवून राज्याच्या वाहतूक परिस्थितीत अनुकूल बदल घडवून आणणे, उत्पादकांसाठीच्या प्रोत्साहनाद्वारे गुंतवणूक आकर्षित करुन, इलेक्ट्रिक वाहन निर्मितीचे कारखाने तसेच ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी, इलेक्ट्रीक वाहनांचे सुटे भाग आणि त्यांचे recycling कारखाने राज्यात स्थापीत करुन उत्पादनास प्रोत्साहन देण्याच्या अनुषंगाने अभियान (Mission) निश्चित केले आहे. त्याचप्रमाणे सदर धोरण शासन निर्णयाच्या दिनांकापासुन दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत राज्यामध्ये राबविण्यात येणार आहे. याबाबतचा प्रस्ताव महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या दिनांक २३.०३.२०२३ रोजी झालेल्या ३९५ व्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सदस्य मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्रमांक ६५७१ पारीत करण्यात आला असुन त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ ची आवश्यकता व गांभीर्य विचारात घेऊन महामंडळाच्या दिनांक २१.०३.२०२२ रोजीच्या परिपत्रकातील मार्गदर्शक तत्वानुसार इलेक्ट्रीक वाहन निर्मीतीचे कारखाने तसेच ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल (ACC) बॅटरी, इलेक्ट्रीक



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

वाहनांचे सुटे भाग आणि त्यांचे recycling कारखाने इत्यादि प्रयोजनाकरिता महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये उपरोक्त धोरण लागू असेपर्यंत म्हणजेच दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत भूखंडाचे प्राधान्याने औद्योगिक दराने वाटप करणे आवश्यक आहे. तथापि, इलेक्ट्रीक वाहन चार्जिंग स्टेशन हे प्रयोजन व्यापारी प्रयोजनात मोडत असल्याने, इलेक्ट्रीक वाहनांच्या चार्जिंग स्टेशनकरिता व्यापारी दराने भूखंड वाटप करण्यात यावे.

सदरहु परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**( अनिल भंडारी )**
सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन)
मऔविम, मुंबई

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / नांदेड / नागपूर
(३) महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन / मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि. / डीएमआयसी / पणन)
(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,
(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,
(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,
(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
(९) सर्व औद्योगिक संघटना
(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in